## शेवडे गुरुजींच्या गोष्टी

# हिरकणी



BVBK-0402886

[illegible]
२८८६
१।१।८४

[illegible], [illegible]
[illegible] वाङ्मय [illegible]
[illegible] २८८६ दिनांक १।१।८४
[illegible] [illegible]

# सिंहाचे छावे

लेखक. रा.वा. शेवडेगुरुजी

BVBK-0402886

मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

# सिंहाचे छावे SINHACHE CHAVE

प्रकाशिका :- मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशन क्रमांक : - ६०१
ISBNI81-85773-29-7

प्रथमावृती : १ सप्टेंबर १९९३

मुद्रक : गिरीश जोशी
श्रीपाद ऑफसेट
१९४/२ अ शिवकृपा
नवी पेठ- पुणे - ४११०३७

टाईपसेटींग : यशोदीप टाईपसेटींग
५९० शनिवार पेठ
पुणे ४११०३०

मुखपृष्ठ : श्री दीपक संकपाळ

मूल्य : रुपये दहा मात्र.

माझ्या मदतीला तत्परतेने धावून येणारे.
मा. वसंतराव कुंभोजकर
व
मारोतराव गुळवणी
या शिक्षकद्वयांना सप्रेम समर्पण.

# अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १) | सिंहाचे छावे | ५ |
| २) | अकाली मन्यू | ९ |
| ३) | पराक्रमी राजकुमार ऋृतध्वज | १३ |
| ४) | वीर बालक दुर्गादास | १९ |
| ५) | वीर बालक स्कंदगुप्त | २२ |
| ६) | देशभक्त राजा राजकुमार | २७ |
| ७) | वीर बालक अभिमन्यू | ३० |
| ८) | अलौकिक बलिदान | ३४ |

म. ए. ए. ग्रंथ, [illegible]
[illegible]
क्र. २८८६ दिनांक ७/११/८२

# सिंहाचे छावे

लेखक: रा. वा. शेवडेगुरुजी

आनंदपूर किल्ल्याला औरंगजेबाच्या मोंगल सैनिकांनी वेढा घातला होता. गुरू गोविंदसिंह, त्यांची पत्नी आणि त्यांची चार मुले आत अडकून पडली होती. किल्ल्यातील मर्यादित शीख सैनिक किल्ला लढवत होते. किल्ल्यातील शिबंदी संपत आली होती.

मोंगल सैनिकांची संख्या अफाट; त्यांच्या पुढे आपला टिकाव लागणार नाही. हे ओळखून शीख सेनाधिकाऱ्याने गुरू गोविंदसिंहांना विनविले .

'मोंगल किल्ला जिंकणार यात शंका नाही.'

'मग तुझं म्हणणं काय आहे?'

'किल्ला शत्रूला देऊन सुरक्षितपणे बाहेर जाऊ देण्याच्या अटीवर तह करावा.'

गुरू गोविंदसिंह एकदम खवळले.

तह म्हणजे शरणागतीच. तह शब्द त्यांच्या कानी आल्यावर कोणीतरी कानात तापलेले शिसे ओतले आहे असे त्यांना वाटले, ते म्हणाले.

'सर्व सैनिकांना बोलवा.'

'ते सर्व दोनशे सैनिक आले. गुरू गोविंदसिंहांच्या

आज्ञेची वाट पहात सेनाधिकारी म्हणाला,

'यांना काय हुकूम आहे आपला?'

'मध्यरात्री शत्रूची फळी मोडून आम्ही जाऊ. आमच्या संरक्षणासाठी शंभर पुढे राहतील आणि शंभर मागे !

'श्री सत् अकाल' अशी घोषणा करीत ते सैनिक आणि गुरू गोविंदसिंह आपल्या कुटुंबियांसह किल्ल्याचा दरवाजा उघडून शत्रूची फळी फोडून गेले.

आनंदपूर किल्ल्यातून गुरू गोविंदसिंह निसटले ही वार्ता अन्य मोगलांना समजण्यास वेळ लागला नाही. पाठलाग सुरू झाला. मूठभर शीख आणि अफाट मोंगल त्यात गुरू गोविंदसिंहाच्या बरोबर त्यांची पत्नी, माता आणि चार मुले होती. त्यांना मोगलांनी गाठले. खणाखणी सुरू झाली. आपली माता आणि धाकटी दोन मुले, एक जोरावरसिंह आणि दुसरा फत्तेसिंह यांना आघाडीच्या शंभर सैनिकांबरोबर एका वाटेने सुरक्षितपणे गुरू गोविंदसिंहांनी पाठवून दिले. उरले ते स्वतः, त्यांची पत्नी, मोठा मुलगा अजितसिंह आणि दुसरा झुंझारसिंह. पिछाडीचे शंभर सैनिक पाठीमागून येणाऱ्या मोंगलाबरोबर प्राणपणाने लढत होते. एकास दहा या प्रमाणात मोगलांना यमसदनास पाठवून मरत होते. गुरू गोविंदसिंहांना समाधान वाटत होते की निदान माता आणि धाकटी मुले सुरक्षित राहिली. इतक्यात त्यांचा मोठा मुलगा अजितसिंह त्यांना म्हणाला,

'पिताजी, हे आता माझ्याच्यानं बघवत नाही.'

‘काय बघवत नाही बेटा?’

‘आपल्या तिर्थांच्या संरक्षणासाठी दोन लाख सैनिकांचं बलिदान होत आहे.’

‘मग मी काय करावंसं वाटतं तुला?’

‘मी त्यांच्या मदतीला जातो. मी अरुंद वाटेवर मोगलांना अडवतो, म्हणजे तुम्हाला झुंझारसिंहाला बरोबर घेऊन सुरक्षितपणे पुढे जाता येईल.’

गुरू गोविंदसिंहांना अजितसिंहांचा अभिमान वाटला. त्यांनी त्याला लढण्यास अनुज्ञा दिली.

प्रचंड खणाखणी करून अजितसिंहाने एका अरुंद वाटेवर मोगलांना थोपवून धरले. अजितसिंह प्रती अभिमन्यूसारखा लढला. आणि अखेरीस अभिमन्यूसारखे त्याला वीरमरण आले. त्याने शेवटच्या क्षणी देवाची करुणा भाकली-पिताजींना व झुंझारसिंहाला सुरक्षित ठेव.

गुरू गोविंदसिंहाचा जोरदार पाठलाग पुन्हा मोगलांनी सुरू केला-त्यांनी त्यांना गाठले. हे पाहून झुंझारसिंह त्यांना म्हणाला,

‘पिताजी’-

‘बेटा,थकला आहेस का?’

‘पराक्रमी गुरू गोविंदसिंहाचा पुत्र कधी थकत नसतो,आणि रणांगणावर तर नाहीच नाही.’

‘मग तुला काय म्हणायचं आहे?’

‘अजितदादा प्रमाणे दिव्य करण्याची अनुज्ञा आपण

मला द्या. मी ही अंगावर आलेल्या शत्रूला थोपवून धरतो, तोपर्यंत आपण सुरक्षितपणे आगेकूच करा.'

बोलल्याप्रमाणे झुंझारसिंहाने भयंकर दिव्य केले. त्याचा पराक्रम पाहून मोगलांचे डोळे दिपले. थोडा वेळ त्यांना गुरू गोविंदसिंहाचा पाठलाग करण्याचा विसर पडला. झुंझारसिंह थोडा लढे, थोडी माघार घेई, पुन्हा लढे, पुन्हा माघार घेई अशी खेळी करत त्याने भरपूर वेळ काढला. अखेर व्हायचे तेच झाले. तो कामास आला, शहीद झाला, त्याला सद्‌गती मिळाली.

सिंहाच्या दोन छाव्यांच्या या अतुल पराक्रमाला इतिहासात तोड नाही. त्याने आपल्या पराक्रमाने शत्रूला थोपवून धरले नसते तर गुरू गोविंदसिंह इतक्या सहजासहजी सुरक्षितपणे संकटपार झाले नसते. गुरू गोविंदसिंहांना त्यांची माता व तिच्या बरोबर गेलेली ती दोन मुले मिळाली.

कुमार अजितसिंह आणि कुमार झुंझारसिंह यांच्या पराक्रमाची गाथा सारा उत्तर हिंदुस्थान विशेषतः शीख जमात अभिमानाने गात असतो.

卐 卐 卐

# अकाली मन्यू

लेखक : रा. वा. शेवडेगुरुजी

'सरदारजी, कुठं चाललात आपण?'

'संतश्रेष्ठ रामसिंहांच्या प्रवचनाला.'

'- आणि आपण?'

'गुरूदेव रामसिंहांचा उपदेश ऐकायला.'

'- आणि तुम्ही?'

'महात्मा रामसिंहाचे बोधामृत पिण्यासाठी'.

'काय सांगतात ते?'

'ऐकल्यावाचून कळणार नाही. त्यांची अमोल वाणी, त्यांचे दिव्य तेज, त्यांची प्रखर देशभक्ती, त्यांची गोरगरिबांविषयीची तळमळ. बाळ, वेळ होतो आहे, आम्हाला जायलाच हवं.'

बारा तेरा वर्षांचा मन्यू आपल्या 'रणजित मोहल्ल्यातील सरदारजींची अशी गडबड अलीकडे नित्य पाहात होता. अखेर काहींना विचारण्याचे धाडस त्याने आजच केले. त्याच्या कानात शब्द घुमू लागले- संतश्रेष्ठ रामसिंह, गुरूदेव रामसिंह, त्यांची अमोघ वाणी, दिव्य तेज, प्रखर देशभक्ती, त्यांची तळमळ!

न कळत सरदारजींच्या मागून एके दिवशी मन्यू

गेला. गावाबाहेर, रानावनांत, झुडपाआड, झाडाखाली, निर्जन वस्तीत रामसिंहाचे पवित्र प्रवचन चालू होते. शिष्य जिवाचे कान करून ऐकत होते. लौकरच वक्तशीरपणामुळे मन्यूची वर्णी शिष्यगणांत लागली. रामसिंहांच्या विचाराने, वाणीने मन्यू पुरा भारला होता आपल्या गुरुदेवाशी मनाने तो एकरूप झाला होता.

गोरक्षणासारख्या धर्मकल्पनांच्या निमित्ताने संघटना बांधावयाची आणि पूर्ण तयारी झाल्यावर जुलमी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र बंडाचा उठाव करून स्वदेश स्वतंत्र करायचा. रामसिंहांचे पवित्र प्रवचन अशा स्वरूपाचे असायचे.

अनुयायांच्या उतावीळपणामुळे म्हणा रामसिंह शिष्यांची ही टोळी पकडली गेली देशद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. शिक्षा-तोफेच्या तोंडी. रोज दहादहांचा गट करून जाहीर रीत्या. लोकांना दशहत बसायला हवी ना?

शिक्षा अमलात आणण्याची जबाबदारी मेजर केवन यांच्यावर होती. कडेकोट बंदोबस्तात शिक्षा अमलात येऊ लागली. आपली बहादुरी दाखविण्यासाठी मेजर केवननी आपल्या प्रिय पत्नीस-जेनीस मुद्दाम बरोबर आणिले होते.

स्वेच्छेने तोफेच्या तोंडी जाणारा पहिला गट बोलाविला गेला. पहिला क्रांतिवीर पुढे झाला. तोफ डागली गेली – धडाड्! धडाड!

अशा धडाडात नवांचा निकाल लागला.

दहावा बंडखोर क्रांतियोद्धा छाती पुढे करून ताठ मानेने ऐटीत चालू लागला. जेनी आपल्या पतीला म्हणाली,

'या तेरा वर्षांच्या बालकानं तुमचं काय पातक केलं आहे? पहा कसा बाळसेदार, गोरागोमटा, सुंदर तेजस्वी दिसतो आहे तो. क्षमा करा त्याला. निष्पाप बालकाची हत्त्या करून तुम्ही काय मिळविणार आहात? देव तरी क्षमा करील का तुम्हाला या पापाबद्दल?'

'ठीक ठीक, विनंती मान्य'. जेनीच्या डोळ्यांतील संतत अश्रुधारा पाहून मेजर केपनना तिची विनंती मान्य करावीच लागली.

त्या बाल क्रांतियोद्ध्याला मोकळे करून मेजर केवनांच्यापुढे उभे करण्यात आले. प्रेमभराने जेनी त्याला कुरवाळू लागली, पटापटा त्याचे मुके घेऊ लागली. मेजर केवन करड्या स्वरात म्हणाले,

'हे बघ पोरट्या, या दयाळू बाईच्या कृपेने तुला मी सोडून दिलं आहे. पण लक्षात ठेव, त्या बदमाष हरामखोर रामसिंहाच्या नादी पुन्हा लागशील तर तुझी गय केली जाणार नाही.'

'बदमाष हरामखोर रामसिंह' हे शब्द कानावर पडताच उकळत्त्या शिशाचा रस कानात कोणीतरी ओतावा असे मन्यूला झाले. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याचे कोमल शरीर क्रोधाने भरभरू लागले.

मेजर केवन म्हणाले,

'बेटा घाबरू नकोस, आम्ही तुला मारीत नाही. पण तू त्या बदमाष रामसिंह. . . . .'

मेजर केवनांचे वाक्य पुरे होण्याच्या आतच मन्यूने त्यांच्या अंगावर उसळून उडी घेतली. मेजर केवन लांबवर दाढी राखीत असत. मन्यूच्या हाताला त्यांची दाढी लागली. ती करकचून ओढीत त्याने मेजर केवनना जमिनीवर लोळविले. तो त्यांच्या छाताडावर स्वार झाला.

सारा प्रकार कसा क्षणार्धात घडला. शिपाई गडबडले, धावले. मन्यूचा हात सुटेना. मेजर केवन ओरडू लागले - 'हात तोडा. हात तोडा!'

मन्यूचे हात तोडले गेले. त्याच्या देहाची खांडोळी केली गेली.

हे भयानक दृश्य पाहताना जेनीने दोन्ही हातांनी आपले डोळे घट्ट मिटून घेतले. तिला चक्कर आली असावी अशा समजुतीने मेजर केवन तिला सावरायला पुढे गेले. त्यांचा हात झिडकारून जेनी म्हणाली,

'ज्या महान भूमीच्या कुशीत अशी बालरत्ने निपजत आहेत ती भूमी पारतंत्र्याच्या जोखडाखाली फार काळ राहूच शकणार नाही. हिंदुस्थानात या बालवीराची खांडोळी झाली, इंग्लंडात याचा पुतळा उभारला गेला असता. खरोखर अकाली मन्यू अमर झाला आहे.'

卐 卐 卐

# पराक्रमी राजकुमार ऋतध्वज

लेखक : रा. वा. शेवडेगुरुजी

महाराज शत्रुजितांनी राजकुमार ऋतध्वजाला बोलावणे पाठविले. त्याप्रमाणे ऋतध्वज आला व तो महाराजांना म्हणाला,

'पिताजी, का बरं बोलवणं केलंत?'

'सांगतो. हे बघ आपल्याकडे थोर ऋषी आले आहेत. गालव त्यांचे नाव. त्यांना प्रणाम कर पाहू.'

राजकुमाराने मुनिवर्यांना वंदन केले आणि तो त्यांना म्हणाला,

'मुनिवर्य, आशीर्वाद द्या. पण एक शंका विचारू?

'अवश्य विचार.' मुनिवर्य गालव उत्तरले.

'हा घोडा इथं तुम्ही दरबारात आणलात.'

'होय, काही खास कारणासाठी.'

'ते कोणतं?'

राजकुमाराची उत्सुकता पाहून महाराज शत्रुजित म्हणाले, बेटा, तुझ्या शंकेच उत्तर मी देतो. हे महान ऋषी आहेत. त्यांचा मोठा आश्रम आहे. आश्रमात अनेक ऋषिकुमार धर्मशास्त्राचा अभ्यास करीत असतात आणि काही ऋषी सुद्धा ह्या गालव मुनींच्या मार्गदर्शनाखाली आश्रमात तप

करण्यासाठी आलेले आहेत.'

'पिताजी, ही तुमची माहिती ऐकून त्यांचा आश्रम पहाण्याची मला तीव्र इच्छा होत आहे.'

'तुझी इच्छा पूर्ण होण्याचा योग दिसतो.'

'मी नाही समजलो पिताजी आपल्या बोलण्याचा अर्थ !'

'पाताळकेतू नावाचा एक दुष्ट राक्षस ह्या ऋषी मंडळींना त्रास देतो. त्यांची शेती उद्ध्वस्त करतो. आश्रम मोडून टाकतो. यज्ञवेदी उद्ध्वस्त करतो आणि हे सारे मायावी स्वरूपात. कधी सिंहाचे रूप घेऊन, कधी वाघाचे रूप घेऊन, कधी रानडुकराचे रूप घेऊन तर कधी पिसाळलेल्या हत्तीचं रूप घेऊन.'

'येवढा अन्याय ही ऋषिमंडळी सहन कसा करतात? त्यांच्या जागी जर मी असतो'-

'बेटा, राजकुमारा, गालव ऋषी मध्येच म्हणाले, 'आम्ही सूर्य देवांची उपासना केली. सूर्यदेव प्रसन्न झाले.'

'त्यांनी एक तेजस्वी घोडा आम्हाला दिला. तो साधा घोडा नाही. त्याला खरा चारा, अन्न वगैरे काही लागत नाही. आणखी सूर्यदेव म्हणाले'-

'काय म्हणाले?'

'ऋषिमुनींचं राक्षसापासून रक्षण करणं हे राजे लोकांचं काम आहे. ह्या घोड्यावर शस्त्रास्त्रात प्रवीण असा ब्रह्मचारी राजकुमारच बसू शकेल. जगाच्या कल्याणासाठी तप करून

मिळविलेली पुण्याई ऋषिमुनींनी असल्या कामी खर्च करू नये.'

'म्हणून ऋतध्वजा.' महाराज सांगू लागले, 'तुला बोलावण्यासाठी ते आले आहेत. राक्षसांच्या जुलमापासून रामलक्ष्मणांनी विश्वामित्राच्या आश्रमाचं रक्षण केलं तसं त्या दिव्य कुवलय अश्वावर बसून पातालकेतूचं तू पारिपत्य कर आणि कीर्तिमान हो.'

'पिताजी, आपण जर आज्ञा द्याल, तर मी ही गोष्ट करायला आनंदानं तयार आहे.'

मुनिवर्य गालव राजकुमार ऋतध्वजाला घेऊन गेले. कुवलय अश्वावर बसून ऋतध्वज गालव मुनींच्या आश्रमाचे आणि आश्रमवासीयांचे रक्षण करू लागला. गालव मुनी ऋतध्वजाला नवी नवी अस्त्रे प्रदान करीत होते आणि तो पारंगत होत होता.

– आणि तो दिवस उजाडला.

आश्रमातील सर्व मंडळी संध्याकाळच्या उपासनेत गर्क असताना पातालकेतू रानडुकराचे रूप घेऊन आश्रमाच्या शेतीची, बागेची नासधूस करू लागला. आश्रमाची पाडापाडी करू लागला. ऋतध्वजाने हे पाहिले. कुवलय अश्वावर तो आरूढ झाला आणि त्या मायावी पातालकेतूवर चाल करून गेला. ऋतध्वजाने धनुष्याने अर्धचंद्राकार बाण लावला आणि त्याने अभिमंत्रण करून तो रानडुकरावर सोडला. सूँ सूँ करीत तो बाण रानडुकराच्या पाठीत घुसला. जखमी

पातालकेतू घाबरला. जीव वाचवण्यासाठी पळू लागला. ऋतध्वज त्याचा पाठलाग करू लागला. जिवावर उदार होऊन पातालकेतू पळत होता. तितक्याच वेगाने ऋतध्वज त्याचा पाठलाग करीत होता. तसाच आणखी एक बाण त्याने रानडुकरावर सोडला तो त्याच्या पाठीच्या दुसऱ्या बाजूस घुसला. पातालकेतू आणखी भयभीत झाला आणि एक अंधाऱ्या खोल भुयारात त्याने उडी घेतली. पाठलाग करण्यासाठी त्या भुयारात आपला कुवलय अश्व ऋतध्वजाने फेकला.

भुयार संपले. नंतर प्रकाशमान पातालनगरी लागली. पातालकेतू कुठेच दिसला नाही. समोर एक सुंदर राजवाडा होता. त्या राजवाड्यात जखमी पातालकेतू दडून बसला असेल म्हणून ऋतध्वजाने एका खांबाला आपला कुवलय अश्व बांधला आणि त्याने राजवाड्यात प्रवेश केला. एक दालन ओलांडल्यानंतर त्याला एक सुंदर महाल लागला. त्या महालाच्या कोपऱ्यात एका मंचकावर बांधलेली एक सुंदर तरुणी त्याला दिसली. ऋतध्वज त्या तरुणीकडे गेला आणि म्हणाला,

'हे सुंदरी, तू कोण आहेस. ?'

'मी गंधर्वकन्या आहे. मदालसा माझं नाव. विश्वावसू माझ्या बापाचं नाव. येथील दुष्ट पातालकेतूनं मला पकडून बांधून ठेवलं. तो आता मला लग्नाची मागणी घालीत आहे.'

'अरेरे. काय हा अन्याय!'

'बऱ्या बोलांनी आठ दिवसांत जर मी लग्नाला कबूल झाले नाही तर तो माझ्यावर लग्नाची सक्ती करणार आहे.'

'मदालसे, अधिक बोलायला वेळ नाही - म्हणून थोडक्यात स्पष्ट सांगतो. राग मानू नकोस. तू मला आवडली आहेस. मी तुझ्याशी लग्न करायला तयार आहे. परंतु -

'परंतु काय?'

'तुझ्या इच्छेविरुद्ध नाही. तसं केलं तर पातालकेतूत आणि माझ्यात फरक तर काय?'

मदालसेने मान्यता दिली आणि त्याच ठिकाणी दोघे गंधर्व पद्धतीने विवाहबद्ध झाले.

त्यांच्या विवाहाची बातमी राजवाड्यातील दासींच्या करवी बाहेर फुटली आणि ती हां हां म्हणता पातालनगरीभर झाली.

जखमांवर उपचार करून घेत असलेल्या पातालकेतूला ह्या बातमीने दुःख झाले आणि क्रोधाने त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने आपले दानव सैन्य बरोबर घेतले आणि ऋतध्वजावर चाल केली.

घनघोर लढाई माजली. ऋतध्वजाने आणि त्याच्या दानवांनी त्यांना ठाऊक असलेल्या अस्त्रांचा आणि शस्त्रांचा मारा करण्यास सुरुवात केली. ऋतध्वजाने आपल्या अमोघ बाणांनी त्या राक्षसांच्या सर्व अस्त्रांचा आणि शस्त्रांचा

चुराडा केला. एका बाजूला केवळ राजकुमार ऋतध्वज आणि दुसऱ्या बाजूला संख्येत अधिक भर पडत जाणारी अफाट राक्षससेना. आपले दिव्य अस्त्र उपयोगात आणण्याची हीच सुवर्णसंधी आहे असे राजकुमार ऋतध्वजाला वाटले. तो कुवलय अश्वावर आरूढ होताच त्याने अर्धचंद्रकार बाण काढून त्वाष्ट्र अस्त्राचे अभिमंत्रण करून तो बाण सोडला. प्रचंड अग्नीची निर्मिती झाली आणि त्यात पातालकेतूसह सर्व राक्षस सैन्य जळून खाक झाले. मदालसा ऋतध्वजाने तिला कुवलय अश्वावर घेतले आणि तो आपल्या नगरीला गेला. शत्रुजित महाराजांनी आणि साऱ्या प्रजेने ऋतध्वज व मदालसा ह्यांचे मनापासून स्वागत केले.

वडिलांच्या मृत्यूनंतर ऋतध्वजाने उत्तम प्रकारे सज्य केले. प्रजेला सुखी केले. मदालसेने त्याला साथ दिली. मदालसेपासून ऋतध्वजाला एक पुत्र झाला. गंधर्वांना खास ठाऊक असलेल्या ब्रह्मज्ञानाचे शिक्षण त्याला बालपणीच देऊन एक तपभर ऋतध्वजाच्या आग्रहाने संसार करून मदालसा आपल्या गंधर्व नगरीला जड मनाने निघून गेली.

卐 卐 卐

# वीर बालक दुर्गादास

लेखक : रा. वा . शेवडेगुरुजी

राजस्थानात छोटीछोटी संस्थाने अनेक. त्यात चित्तोड, जोधपूर, जयपूर ही आपल्या शौर्याबद्दल गाजली. शहाजहान बादशहाच्या काळी जोधपूरवर यशवंतसिंह नावाचा राजा राज्य करीत होता. त्याचे उंटदळ होते.

असेच एके दिवशी उंटदळाचा रक्षक त्याच्याकडे आला. त्याला घाबरलेला पाहून यशवंतसिंह महाराज म्हणाले,

'तू असा घाबरलास का? तुला काय हवंय?'

महाराज,शेतकऱ्याच्या एका पोरानं शाही उमदा उंट मारला.'

'काय! एका पोरटयाची एवढी हिंमत?'

'म्हणून तर आपणाकडे तक्रार घेऊन आलो.'

महाराजांनी टाळी वाजविली. दोन पहारेकरी हजर झाले. महाराज म्हणाले,

'हा रक्षक सांगतो त्या शेतकरी पोराला पकडून आणा'.

शेतकऱ्याच्या पोराला-दुर्गादासाला पकडून आणण्यात आले. गयावया करीत त्याच्या मागून त्याचा बाप आसकरणही आला. आसकरण अजीजीने म्हणाला,

'महाराज,गुन्ह्याची क्षमा असावी. माझा पोरगा अजून

अल्लड आहे.'

शेतकऱ्याच्या बोलण्याकडे महाराजांचे लक्षच नव्हते. त्या पोराच्या उमदेपणावर आणि करारीपणावर ते खूष झाले होते. ते म्हणाले,

'पोरा, तुझं नाव काय?'

'दुर्गादास, पण दुर्गा म्हणतात मला.'

'तू शाही उंट मारलास म्हणे'?

'होय.'

'का? आमच्या उंटानं तुझं काय घोडं मारलं होतं?'

'महाराज,उगाच उंट मारायला माझं डोकं फिरलेलं नाही.'

'काय केलं उंटानं ?'

'तुमचे शाही उंट आमच्या गव्हाच्या शेतात शिरले. हाता-तोंडाला आलेलं पीक भसाभसा खाऊ लागले. मग महाराज तुम्हीच सांगा अशी शेतं वाया गेली तर आम्ही गरीब शेतकऱ्यांनी खायचं काय?'

'रखवालदार कुठं होता?'

'कोणाला ठाउक? तिथं नव्हता एवढं खरं'.

महाराजांनी रखवालदाराकडे पाहिले, त्याचे अपराधी मन त्याला खाऊ लागले. त्याची मान खाली वळली. महाराजांच्या डोळ्याला डोळा तो लावू शकला नाही. महाराज दुर्गादासला म्हणाले,

'अरे,किशोरवयाचा पोर तू. तू उंट मारलास? ? खरंच वाटत नाही मला. एखादं मरतुकडं उंट्राचं पिलू तर मारलं नाहीस ना?'

दरबाराच्या समोर मोठा दरवाजा होता. त्या दरवाज्याच्या पुढे छोटी बाग होती. त्या बागेतून पखालीचा एक धिप्पाड उंट जाताना दुर्गादासाला दिसला. रक्ताळलेली त्याची तलवार त्याच्या हातात नंगीच होती. ठेक्यात उड्या मारत त्या उंटावर दुर्गादास चाल करून गेला. त्याने आपल्या तलवारीच्या सर्व शक्तीनिशी उंटाच्या वाकडया मानेवर जबरदस्त वार केला. उंटाचे मुंडके धडावेगळे झाले. गेल्या पाउली दुर्गादास परत आला. साऱ्या दरबारवासियांचे लक्ष या दुर्गाच्या पराक्रमाकडे होते. आपली रक्ताळलेली तलवार महाराजांच्या चरणासमोर ठेवून नम्रतापूर्वक तो म्हणाला,

'महाराज, आता तरी आपली खात्री झाली ना?'

वीर बालक दुर्गादासची महाराजांनी पाठ थोपटली. त्यांनी राजाश्रय दिला. त्याच्या वीर वृत्तीला शोभेल असे सैनिक शिक्षण त्याला देऊन तरबेज केले.

हाच वीर बालक पुढे मोठा झाल्यावर इतिहासात सेनानी दुर्गादास राठोड या नावाने प्रसिद्धीस आला. यशवंतसिंह महाराजांच्या पश्चात त्याने त्यांच्या राणीचे आणि राजकुमार अजयसिंहाचे क्रूर औरंगजेब बादशहापासून संरक्षण केले. यवनांच्या ताब्यातून मारवाडचे राज्य मुक्त करण्याकडे दुर्गादासाचा सिंहाचा वाटा होता.

卐 卐 卐

# वीरबालक स्कंदगुप्त

लेखक -रा. वा. शेवडेगुरुजी

हिमालयाच्या पलीकडून मोठया तयारीनिशी हूण भारतावर चालून येणार आहेत अशी बातमी मगध राजा सम्राट कुमारगुप्त याला समजली. त्याबाबत विचार विनिमय करण्यासाठी त्याने दरबार भरविला. दरबारात प्रधानमंत्री व अन्य मंत्रिमंडळ, प्रमुख सेनापती व अन्य उपसेनानी वगैरे अनेकांना निमंत्रित केले होते. आजच्या दरबाराचे आणखी एक वैशिष्ट्य असे होते की सम्राटांचा षोडशवर्षीय मुलगा स्कंदगुप्त यालाही दरबाराचे निमंत्रण गेले होते. त्याने नुकताच आपल्या शस्त्रास्त्रविद्यांचा अभ्यास पुरा केला होता. त्याने आपले शरीर योगविद्येने व सर्वांग-सुंदर व्यायामाने इतके कमविले होते की कुणालाही वाटावे एखाद्या कसलेल्या वीराचा तो सहज पराभव करू शकेल.

दरबार सुरू झाला.

नवीन सैन्यभरती करावी, मिळतील तितकी आणि मिळतील तिथून शस्त्रास्त्रे आणावीत, राज्याच्या सीमेवरील चौक्या वाढवाव्यात, शत्रूने सहज ओलांडण्याचा प्रयत्न केला तर त्याला तेथेच थांबवावे, वगैरे गोष्टी सामान्यपणे ठरविण्यात आल्या. या विचार-विनिमयामध्ये स्कंदगुप्ताला

कोणी काही विचारले नाही. शेवटी शेवटी त्याने आपल्या वडिलांना नम्रतेने विचारले,

'पिताजी, मी काही सुचविले तर लहान तोंडी मोठा घास घेतल्यासारखे तर होणार नाही ना?'

'बोल बेटा, बोल. तू वयानं लहान असलास तरी कर्तबगारीनं शूर वीर आहेस. तुझा शस्त्रास्त्रविद्यांचा अभ्यास पाहता खरे तर या पूर्वीच तुला बोलण्याची संधी आम्ही द्यायला हवी होती.'

'राजकुमार स्कंदगुप्तांना काय सांगायचं आहे?' प्रधानजींनी प्रश्न केला.

स्कंदगुप्त बोलू लागला,

'शत्रू येणार तो पूर्ण तयारीनिशी मोठ्या सैन्यबळानं नि प्रचंड शस्त्र सामग्रीनं. तो तयारीस लागला आहे अशी गुप्त हेरांची बातमी आहे. तेव्हा मी म्हणतो -'

'बोल बेटा बोल. निःशंकपणे बोल.' सम्राटांनी त्याला धीर दिला.

'नवी सैन्यभरती मगधाचं रक्षण करील. आपल्याकडे अनुभवी असलेले दोन लाख सैनिक आहेत. त्यांना घेऊन, शत्रू भारतात पाऊल टाकण्याच्या आतच आपण त्याच्या मुलुखात जावे व कापाकापी करावी.'

'याचा परिणाम काय बरं होईल?' सेनापतींना शंका आली.

'आपल्या कुटुंबियांचं रक्षण करायचं की दाणागोटा

आणि तिजोरी सांभाळायची, अशा त्रिविध मनःस्थितीत, शूरापेक्षा क्रूर म्हणून बदनाम असणाऱ्या हूणांची एकच हैराणगत होईल.'

'विचार चांगला आहे पण थोडा धाडसाचा वाटतो.' प्रधानजींना शंका आली.

'पिताजी, 'स्कंदगुप्त पुढे बोलू लागला. आजपर्यंत तुम्ही माझे सारे लाड पुरविलेत. आता आणखीन एकच हट्ट आपण पुरवावा अशी माझी नम्र विनंती आहे.'

'काय हवंय बेटा तुला?'

'या, स्वारीचं नेतृत्व आपण मजकडे द्यावे.'

'आणि सेनापती?'

'त्यांनी मागे मगधात राहून राजरक्षण करावं.'

राजकुमार स्कंदगुप्ताचे हे वीरश्रीचे उद्‌गार ऐकून या लढाईमध्ये तो निश्चित विजयी होईल असे सर्वांना वाटले.

आपले दोन लक्ष सैनिक घेऊन मोर्चे बांधणी करून व युद्धाचे डावपेच त्यांना समजावून सांगून राजकुमार स्कंदगुप्त विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर चालला-

मगधाची सरहद्द ओलांडून पंजाबात आला. पंजाब ओलांडून पठाणांच्या मुलुखात आला. या साऱ्यांनी त्याचे स्वागत करून त्याला खंडणी दिली. नंतर त्याने अफगाणिस्तानची सरहद्द ओलांडून हिमालयाची बर्फाळ चढण तो लढू लागला - डोंगरावर गेल्यानंतर पलीकडे अस्ताव्यस्त

पसरलेले अपुऱ्या तयारीत असलेले हूण सैनिक त्याच्या दृष्टीस पडले - 'भारत माता की जय' असा जयजयकार करीत स्कंदगुप्ताची मागधी सेना हूणांच्यावर तुटून पडली. या अनपेक्षित हल्ल्याने हूणांची गाळण उडाली. ते सैरावैरा पळाले. स्कंदगुप्ताने जे आडवे आले ते कापून काढले. जे पळून गेले त्यांचा पाठलाग करण्यात वेळ न दवडता शस्त्रास्त्रांची प्रचंड लूट घेऊन तो परतीच्या मार्गावर हिमालयाची चढण चढू लागला.

राजकुमार स्कंदगुप्ताने किशोर वयातच मिळविलेल्या प्रचंड विजयाची वार्ता सम्राट कुमारगुप्ताकडे आधीच येऊन पोहोचली. तो स्कंदगुप्ताच्या स्वागताला लागला. दोघांची भेट मगध साम्राज्यांच्या सीमेवर झाली. तेथेच स्कंदगुप्ताचा भव्य सत्कार करण्याचे कुमारगुप्ताच्या मनात होते. परंतु विजयी मागधी सेना प्रवासाने थकल्यामुळे नि आपल्या घरी जाण्यात उत्सुक आहे हे लक्षात घेऊन सर्वजण राजधानीस परत आले.

एका शुभमुहूर्तावर कुमार स्कंदगुप्ताचा सत्कार करण्यात आला. त्याला युवराजपदही याच समारंभात बहाल करण्यात आले.

• कालांतराने युवराज स्कंदगुप्त गादीवर आला. त्याची प्रजा त्याला सम्राट स्कंदगुप्त या नावाने ओळखू लागली. सम्राट स्कंदगुप्ताची कारकीर्द गाजली. अफगाणिस्तान व इराण ही राज्ये त्याने आपल्या साम्राज्यात समाविष्ट करून

घेतली. एका दृष्टीने अत्यंत पराक्रमी व दुसऱ्या बाजूने तितकाच प्रजाप्रेमी अशा या सम्राट स्कंदगुप्ताने 'अश्वमेध' यज्ञ केला.

प्रजेच्या सुखाकडे त्याने लक्ष दिले. जितका तो दयाळू होता तितकाच तो न्यायी होता. अशा या स्कंदगुप्ताचे जीवन नव्या पिढीला सदैव प्रेरणादायी ठरेल यात शंकाच नाही.

卐 卐 卐

# देशभक्त राजा राजकुमार

लेखक : रा. वा. शेवडेगुरुजी

दक्षिण हिंदुस्थानात हैद्राबाद या नावाचे एक मोठे संस्थान होते. त्याच्यापासून काही मैलांवर जयपूर या नावाची एक जहागीर होती. त्या जहागिरीवर सोळा वर्षांचा राजकुमार नावाचा राजा राज्य करीत होता. त्या जहागिरीच्या राजकुमाराने १८५७ साली इंग्रजांच्या विरुद्ध लढण्यासाठी अरब आणि रोहिला पठाणांची एक पलटण तयार केली.

हैद्राबादवर निजामशहा राज्य करीत होता. 'सालारजंग' नावाचा त्याचा मुख्यमंत्री होता. सालारजंगाने कपटाने जिरापूरच्या राजा राजकुमाराला कैद केले आणि इंग्रज सेनाधिकारी कर्नल टेलरच्या स्वाधीन केले.

कर्नल टेलरचे या राजकुमारावर मोठे प्रेम होते. राजा त्याला 'आप्पा' या वडिलांच्याइतक्या आदराने संबोधीत होता. राजाला तुरुंगात ठेवले होते. राजाला मोठी शिक्षा व्हावी असे टेलरला वाटत नव्हते. तो त्याला तुरुंगात भेटण्यासाठी गेला. त्याला बाहेर बोलावून त्याच्या पाठीवरून हात फिरवीत टेलर म्हणाला,

'राजकुमार, तुला कडक शिक्षा व्हावी असं मला वाटत नाही.'

'मग सोडून दे मला.'

'तसंही मी करू शकत नाही.'

'मग तुझ्या मनात काय आहे?'

'आम्हा इंग्रजांच्या विरुद्ध कोण कोण आहेत त्यांची नावं सांग म्हणजे इंग्रज तुला क्षमा करतील.'

टेलरचे हे उद्‌गार ऐकून राजाला चीड आली. त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. तो म्हणाला,

'तुम्ही इंग्रज परके. तुमच्या विरुद्ध लढणाऱ्यांची नावं सांगणं म्हणजे माझ्या मातृभूमीशी तो द्रोह ठरेल. मी कुणाचीही नावं सांगणार नाही. स्वत: क्षमा मागणार नाही. मग कितीही मोठी शिक्षा मला भोगावी लागली तरी चालेल!'

कंठ दाटून कर्नल टेलर म्हणाला,

'तुला देहांताची शिक्षा होईल. तुला फाशी दिले जाईल.'

'मी मरणाला भीत नाही. माझ्यावर तुझं प्रेम आहे असं तू म्हणतोस म्हणून एक विनंती करतो.'

'काय विनंती आहे बेटा तुझी?'

'फासावर चोरांना, दरोडेखोरांना चढवतात. देशभक्तांना नाही. देशभक्तांना तोफेच्या तोंडी देतात तशी तू मला तोफेच्या तोंडी देण्याची व्यवस्था कर आणि 'भारत माता की जय' अशी घोषणा देत शांत चित्ताने मी कसा तोफेच्या तोंडी जाईन ते तू पहा.'

कर्नल टेलरच्या सांगण्यावरून राजकुमाराचे वय लक्षात घेऊन त्याला मृत्युदंडाची शिक्षा न देता काळ्या पाण्याची

शिक्षा सुनावली गेली.

तो टेलरला म्हणाला, ‘असली भ्याडासारखी शिक्षा आमच्याकडील मर्द पहाडी शिपाई सुद्धा मान्य करणार नाही. मी तर राजा राजकुमार आहे.

‘मग तू काय करणार आहेस?’

ते योग्य वेळी तुला कळेलच!

काळ्या पाण्यावर अंदमानला पाठविण्यासाठी राजाला दोन गोऱ्या सैनिकांनी तुरुंगाबाहेर काढले. मोटारीमध्ये बसण्याचा त्याला हुकूम देण्यात आला. तो राजाने मानला नाही. त्या सैनिकाच्या कमरेला लटकणारे पिस्तूल त्याने चपळाईने काढून घेतले आणि स्वत:च्या छातीवर थाड! थाड! थाड! अशा तीन गोळ्या झाडून घेतल्या. राजा जमिनीवर कोसळला आणि भारत माता की जय’ असे म्हणून गतप्राण झाला.

कर्नल टेलरच्या तोंडून नकळत उद्गार गेले – ‘अशी शूर मुले जर या देशात निपजतील तर आम्ही ब्रिटिशांनी आपले चंबूगबाळे लवकर गुंडाळून इंग्लंडला परत जावे हेच खरे!

卐 卐 卐

# वीर बालक अभिमन्यू

लेखक : रा.वा. शेवडेगुरुजी

सूर्योदय झाला. युद्धावर जाण्याची वेळ झाली. पांडवांच्या गोटात कोणामध्येही उत्साह नव्हता. अभिमन्यूला हे वातावरण पाहून दुःखमिश्रित आश्चर्य वाटले. युद्धासाठी कौरव रणांगणावर येऊन सज्ज झाले होते. त्यांनी फुंकलेल्या शंखाचा निनाद वातावरणात घुमत होता. तो अभिमन्यूने ऐकला. अभिमन्यू धर्मराजाकडे गेला. आणि म्हणाला.

'तात, आपण सगळे अजून उभे कसे? युद्धावर जायचे नाही का?'

'गेलं तर पाहिजेच, एक महान संकट आज आपल्यावर कोसळलं आहे.'

'ते कोणतं तात?'

'द्रोणाचार्यांनी चक्रव्यूहाची रचना केली आहे.'

'मग त्यात काय झालं?

'तो फोडून प्रवेश करणे एका अर्जुनाशिवाय कुणालाही शक्य नाही.'

'मग कुठे आहेत पिताजी?'

'संसप्तक राजांनी निमंत्रित केल्यामुळे कुरूक्षेत्रापासून काही मैल अंतरावर ते त्यांच्याशी लढायला गेले आहेत. आणि त्याच्या शिवाय तर चक्रव्यूह भेदण्याची विद्या कुणालाच

अवगत नाही.'

'तात, मग काय बिघडलं? हा वीर अभिमन्यू ती विद्या जाणतो.'

'पण बाळ, तू तर पंधरा वर्षांचा कोमल कुमार आहेस. तुझ्यासारख्याला आम्ही पुढे पाठवायचं याची मोठी खंत आम्हाला वाटते.'

'मी आघाडीवर जातो. तुम्ही माझ्या मागून या.'

वीर अभिमन्यूने धर्मराज, भीम, नकुल, सहदेव यांना वंदन करून चक्रव्यूह भेदण्याची अनुज्ञा घेतली.

पुढे अभिमन्यू व मागे पांडव चक्रव्यूहाच्या ठिकाणी गेले. चक्रव्यूहाच्या दाराशी जयद्रथ उभा होता. त्याने अभिमन्यूला आत जाऊ दिले आणि इतर पांडवांच्या बरोबर तो लढू लागला. चक्रव्यूहात अभिमन्यू लढत होता. बाहेर पांडव लढत होते. पांडवांनी शिकस्त केली परंतु शंकराच्या वरदानाने समर्थ झालेल्या जयद्रथाला पराभूत करून अभिमन्यूच्या मदतीला ते जाऊ शकले नाहीत.

आत अभिमन्यू एकाकी पडला. परंतु तो वीर बालक होता. अर्जुनाचा पुत्र होता. श्रीकृष्णाचा भाचा होता. अभिमन्यूने घनघोर युद्ध सुरू केले. कर्णाने बाणांचा वर्षाव केला. सर्व बाण परतवून लावून अभिमन्यूच्या दोन बाणांनी कर्णाचे दोन्ही कर्ण विंधले गेले. दुर्योधन, दु:शासन, अश्वत्थामा साऱ्यांनी अभिमन्यूवर चाल केली. पण अभिमन्यू डगमगला नाही. त्याने त्या साऱ्यांना पिटाळून लावले. ते बाण संपल्यामुळे आणि धनुष्य तुटल्यामुळे पळून जायचे. नवीन

धनुष्यबाण आणून पुन: लढायचे अशा त्या युद्धात अभिमन्यूचा सारथी मारला गेला, अभिमन्यूचे घोडे मारले गेले. अभिमन्यूचा रथ तोडला गेला. सुदर्शन चक्रासारखे रथाचे चाक हातात घेऊन अभिमन्यू लढू लागला. चाकांचे तुकडे-तुकडे झाले. बाण संपले, धनुष्य तुटले, हातात गदा घेऊन गरगर फिरवून त्याने शत्रूला पळता भुई थोडी केली. अभिमन्यूचा आवेश पाहून दु:शासनाच्या मुलाला, लक्ष्मणाला स्फूर्ती चढली व तोही एक गदा घेऊन युद्धात उतरला. त्याची व अभिमन्यूची प्रचंड खणाखणी झाली. अभिमन्यूच्या गदेचा एक तडाखा लक्ष्मणाला बसला. त्याच क्षणी लक्ष्मणाच्याही गदेचा तडाखा अभिमन्यूला बसला. दोघेही मूर्च्छित झाले. अभिमन्यूच्या डोळ्यांवर पाणी शिंपडण्यास कोणी नव्हते. लक्ष्मणाच्या डोळ्यांवर कौरव सैनिकांनी पाणी शिंपडल्यामुळे तो लवकर शुद्धीवर आला. अभिमन्यू बेशुद्ध पडला आहे. शुद्धीवर येण्यापूर्वीची हालचाल तो करीत आहे हे पाहन कपटाने युद्धाचा नियम मोडून लक्ष्मणाने अभिमन्यूवर गदेचा प्रहार करून अभिमन्यूला जखमी केले. अभिमन्यू आता यातून उठू शकणार नाही याची कौरवांना खात्री झाली आणि अभिमन्यू मेला, अभिमन्यू मेला अशा गौरवाच्या घोषणा देऊन त्या संध्याकाळचे युद्ध संपले. अभिमन्यूच्या पतनाची वार्ता पांडवांना समजली. ते दु:खी-कष्टी झाले. कृष्ण आणि अर्जुन संसप्तक राजाला पराभूत करून पांडवांच्या गोटात परत आले. अभिमन्यूच्या पतनाची वार्ता त्यांना समजली. अर्जुन संतप्त झाला. ते दोघे अभिमन्यूला

शोधण्यासाठी रणांगणावर गेले. असंख्य सैन्य मृत झाले होते. भयाण शांतता पसरली होती. त्यात अंधाराने भर घातली होती. हे तात, हे मातुल, हे तात, हे मातुल असं कण्हत कण्हत उद्‌गार काढणाऱ्या अभिमन्यूचे हे बोल कृष्णार्जुनांनी ऐकले. आवाजाच्या अंदाजाने मोठ्या कष्टाने ते अभिमन्यूकडे गेले अर्जुनाने खूप शोक केला. कृष्णाने त्याचे सांत्वन केले. त्याचा फार उपयोग झाला नाही. अखेर अभिमन्यूला काही बोलायचे आहे असे वाटल्यावरून कृष्णाने त्याला विचारले,

'बेटा, तुला काही सांगायचं आहे का?'

'होय, मातुल.'

कृष्ण व अर्जुन जिवाचे कान करून ऐकायला लागले अभिमन्यू म्हणाला,

'मी क्षत्रिय आहे. रणात मला वीराचं मरण आलेलं आहे. मला मरणाचं दु:ख नाही पण --'

'पण काय बेटा?' अर्जुनाने विचारले

'मी विकलांग होऊन पडलो असताना माझ्या मस्तकावर तुच्छतापूर्वक जयद्रथाने लत्ताप्रहार केला--'

अर्जुनाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. हुंदका आवरून तो एकच वाक्य बोला,

'उद्या सूर्यास्तानंतर जयद्रथ या जगात दिसणार नाही.'

हे अर्जुनाचे उद्‌गार ऐकून वीर अभिमन्यूने प्राण सोडला.

卐 卐 卐

# अलौकिक बलिदान

लेखक रा.व. शेवडेगुरुजी

बादशहा अकबराने आपल्या सेनापतीस बोलावणे पाठविले. सेनापती येऊन म्हणाला,

'खाविंद, का याद केलीत?'

'एका खास गोष्टीसाठी'

'ती कोणती?'

'मला रुखरुख लागून राहिली आहे की मी अजून चितोड जिंकले नाही.

'मला हुकूम करा. हीच नामी संधी आहे.'

'म्हणजे?'

'गादीवर उदयसिंह आहे, जितका भ्याड तितकाच ख्यालीखुशालीत राहणारा. त्यात-'

'खाविंद, गुपचुप हल्ला चढवायचा. हुकूम व्हावा.'

'स्वारीवर आम्ही खुद जाऊ इच्छितो.'

'पण जहापन्हाह, मग आम्ही बंदे कशासाठी आहोत?.'

'वीरश्रीनं रजपूत कसं लढतात, राण्या प्रसंगी मैदानात कशा उतरतात किंवा 'जोहार' कसा करतात हे आँखो हाल पहायचे आहेत आम्हाला.'

पुष्कळ विचार-विनिमय झाला. दहा हजार फौज

घेऊन स्वत: अकबर चालला. चितोडपासून तीस-पस्तीस मैल गेल्यावर चितोडच्या जासुदांना त्याचा पत्ता लागला.

जासुदांनी सेनापतीला - जयमलला अकबराच्या स्वारीची व तो अगदी नजीक आल्याची वार्ता सांगितली. हे ऐकताच उदयसिंहाची भीतीने गाळणच उडाली. चितोड सोडून तो पळून गेला. चितोड लढविण्याची जबाबदारी आता सेनानी जयमलवर येऊन पडली. त्याने तत्परतेने सेना गोळा केली. कडव्या राजपूतांनी अकबराला मागे रेटले- जयमलच्या पराक्रमाने तो अवाक् झाला. उंटदलातील एका मोंगली सैनिकाने नेम धरून बंदूक झाडली. जयमल त्या गोळीला बळी पडला. सामान्यत: कडवा राजपूत मोडतो पण वाकत नाही. पुत्तर विजयसिंह नावाच्या सोळा वर्षांच्या कुमाराने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आपल्या आईकडे जाऊन लढण्याची अनुज्ञा मागितली. तो म्हणाला,

'माते, प्रसंग बाका आहे.'

'पुत्तर, तू काय म्हणणार आहेस ते मी ओळखले.'

'मग मी जाऊ ना लढायला?'

'अवश्य.'

'पण तुमचं काय ?'

'मी, तुझी बहीण व माझी लाडली बहु, साऱ्यांना तलवार चालवायला येते. जौहार करण्यापेक्षा लढणं आम्ही पसंत करतो.'

वीर पुत्तर विजयसिंह रणांगणात आला. त्याने सैन्याला

धीर दिला. जरी सोळा वर्षांचा होता तरी शर्थीच्या सामर्थ्याचा शूरवीर होता. त्याच्या शौर्याने राजपूतांना चेव चढला. त्यांनी सपासप मोंगली सैन्य कापून काढण्यास सुरुवात केली

प्रसंगाचे अवधान राखून अकबराने आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एक भाग समोरासमोर लढत होता. तर दुसरा भाग अकबराच्या नेतृत्वाखाली विजयसिंहाची मदत तोडून त्याला एकाकी पाडत होता.

थोडे आगेकूच केल्यावर एक अलौकिक दृश्य अकबराच्या दृष्टीस पडले. विजयसिंहाची बहीण मरून पडली होती. त्याची माता व पत्नी लढता लढता घायाळ झाली होती. तेथे पुत्तर विजयसिंह आला होता. तो आपल्या वीरमातेला म्हणाला,

'माँ !'

'बेटा, काहीही न बोलण्यांची ही वेळ आहे.'

'पण --'

'वेळ गमावू नकोस -- पुढे जा व दुष्ट शत्रूवर तुटून पड. विजयी झालास तर --'

'पण माँ; धारातीर्थी पडलो तर ?'

'आपली भेट स्वर्गात होईल. सारा राजस्थान तुझी यशगाथा गाईल..'

पुत्तर विजयसिंह म्हणाला तसेच झाले. प्राण पणाला लावून अकबराशी लढता लढता धारातीर्थी तो मरण पावला.

एकाच कुटुंबातील एक नर व तीन नारी रत्ने मातृभूमीच्या रक्षणार्थ कामी आली.

बादशहा अकबर विजयी झाला. त्या चार हुतात्म्यांच्या देहांचे सन्मानपूर्वक दहन करण्याची व्यवस्था करून त्याने चितोड नगरीत प्रवेश केला.

राजस्थानच्या लोकबोलीत आजही या वीर नरनारींची अमरगाथा खेडोपाडीच्या यात्रेत आदरपूर्वक गायिली जात असत.

卐 卐 卐

BVBK-0402886